## महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
### प्रशि. पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा) सत्र क्रमांक 111,
### अंतिम परिक्षा, जानेवारी - 2015

| | | |
|---|---|---|
| पेपर क्रमांक | - 09 | एकुण गुण- 100 |
| विषय | - तपास (प्रात्याक्षिक) | वेळ - 1000 ते 1300 |
| दिनांक | - 20/01/2015 | वार - मंगळवार |

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सूचना :
अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहे.
क. वाचनीय अक्षरात उत्तरे लिहावी.
ड. फक्त निळया / काळया पेनचाच वापर करावा.
इ. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
ई. मोबाईल फोन / पुस्तके परिक्षा कक्षात आणण्यास मनाई आहे.
उ. परिक्षा सुरु असतांना कॉपी करतांना किंवा बोलतांना आढळून आल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
ऊ. पुरवणी उत्तरपत्रिकेवर नाव व रोल नंबर लिहू नये.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

**प्र.1 खालील घटना वाचून त्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे द्या.** **गुण**

नाशिक मधील गांधीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुंबई आग्रा महामार्गावर 'कमानी चौक' या ठिकाणी एक मालट्रक मुंबईकडून भरधाव वेगाने नाशिककडे येत होता. त्यावेळी सदर ठिकाणावरुन त्याच दिशेने जाणाऱ्या एका मोटारसायकलला ट्रकने मागून येऊन धडक दिली असता मोटारसायकल व त्यावरील स्वार खाली पडले. त्यातील मोटारसायकलच्या मागील सीटवरील गणेश हा गंभीर जखमी झाला व मोटार सायकल चालक रुपेश हा किरकोळ जखमी झाला. गणेश यास आजुबाजूच्या लोकांनी सिव्हील हॉस्पीटल मध्ये दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास दाखल करण्यापुर्वीच मयत घोषीत केले.

[अ] मोटारसायकल चालक रुपेश याची प्रथम खबर तयार करा. 20

[ब] घटनास्थळाचा पंचनामा तयार करा. 20

[क] मयताचा इन्क्वेस्ट पंचनामा तयार करा. 20

[ड] प्रत्यक्ष घटना पाहणारा साक्षीदार गोपाळ कुमार याचा जबाब तयार करा. 10

**प्र.2 खालील घटना वाचून त्यावर आधारीत प्रश्नांची उत्तरे द्या.**

गंगापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कॉलेज रोडवर सायंकाळी 07.00 वा. च्या सुमारास श्रीमती सुलभा काणे, वय 65 वर्षे या रस्त्याने जात असतांना समोरुन येणाऱ्या मोटार सायकलवरील मागे बसलेल्या इसमाने श्रीमती.काणे यांच्या गळयातील दोन तोळे वजनाची सोन्याची चेन जबरदस्तीने हिसकावून घेऊन भरधाव वेगाने निघून गेले.

श्रीमती. काणे यांच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस तपासात संशयीत राजेंद्र काळे यांना अटक करण्यात आली आहे.

[अ] वर नमूद गुन्हयातील अटक आरोपी राजेंद्र काळे याची 7 दिवस पोलीस कस्टडी रिमांड मिळणेबाबत न्यायालयास रिपोर्ट सादर करा. 15

[ब] गुन्हयाच्या तपासाची पहिल्या दिवसाची केस डायरी लिहा. 15

***